# मनमाडला राष्ट्रीयकृत बँकेतील घोटाळा पुन्हा एकदा उघडकीस

**मनमाड ।** कामगार वस्तीचे गाव म्हणून ओळख असलेल्या मनमाड शहरातील एका राष्ट्रीयकृत बँकेमध्ये सेवानिवृत्त मयत कर्मचाऱ्यांच्या पश्चात मिळालेल्या भविष्य निर्वाह निधी ग्रॅच्युइटीसह जवळपास ३१ लाख रुपयांचे अपहार झाल्याची घटना घडली आहे. गेल्या दीड वर्षापूर्वी देखील शहरातील राष्ट्रीयकृत बँकेमध्ये असाच घोटाळा घडला होता. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून कष्टाने कमावलेला पैसा आता सुरक्षितरित्या कुठे ठेवावा, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. याप्रकरणी मनमाड पोलिस स्थानकात फिर्याद दाखल करण्यात आले असून विविध कलमान्वये ठकबाजीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतील व्यवस्थापक कॅशिअर व त्यांच्या सहकार्यांनी

## पोलीस स्थानकात ठकबाजीचा गुन्हा दाखल




भारतीय अन्न महामंडळातील सेवानिवृत्त मयत कर्मचारी बाळू सोनवणे यांच्या मृत्यू पश्चात मिळालेल्या भविष्य निर्वाह निधी ग्रॅच्युइटीसह सुमारे ३० लाख ७९ हजार रूपयांचा अपहार केल्याची फिर्याद मयत कर्मचाऱ्याची पत्नी रत्ना बाळू सोनवणे (वय ४९) रा.मुरलीधर नगर, मनमाड यांनी मनमाड पोलिस स्थानकात फिर्याद दिली आहे. रत्ना सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, कोरोना काळात आपले पती बाळू सोनवणे १३/९/२०रोजी मयत झाले. रत्ना सोनवणे यांनी स्टेट बँकेत त्यांच्या भविष्यनिर्वाह निधी ग्रॅच्युईटीसह मिळालेली ३० लाख ७९ हजारांची रक्कम जमा केली. त्यावेळी मॅनेजर नाईक व हितेश शर्मा यांनी आपल्या मुलांना विविध प्रलोभने दाखवित त्यांचे नावे इन्शुरन्स व काही रक्कम फिक्स डिपॉझिटमध्ये टाकली व विना तारखेचे कोरे चेक सह्या करून घेतले. त्यानंतर पैशांची आवश्यकता असल्याने शर्माकडे आपण एफ.डी. विड्रॉल करण्यास सांगितले. दरम्यान १७/२/२३ ते ३/६/२४ पर्यंत शर्मा याने आपल्या बँकविषयक अज्ञानाचा गैरफायदा घेत ३० लाख ७९ हजारांच्या बँकेतील रक्कमेचे धनादेश स्वत:चे फायद्यासाठी वेगवेगळ्या इसमांच्या नावे या काळात वर्ग करून घेतले. हे समजल्यावर हितेश शर्माकडे रक्कम मिळवण्यासाठी विचारणा केली तेंव्हा त्याने या बाबत नोटरी करून सुरूवातीला पाच लाख रूपये देण्याचे मान्य केले. परंतू त्याने ते न दिल्याने ३ मार्च २५ रोजी त्याच्या घरी जावून वरील रकमेची मागणी केली. मात्र त्याने 'तुला जे करायचे ते कर' मी कोणतीही रक्कम देणार नाही. मी पोलिसांना घाबरत नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर मनमाड पोलिस स्थानकात त्यांच्या विरूध्द फिर्याद दिल्याचे रत्ना सोनवणे यांनी म्हटले आहे. त्यानुसार पोलिसांनी तत्कालीन बँक मॅनेजर नाईक, बँकेचे कॅशिअर तसेच एस.बी.आय. लाईफचे हितेश शर्मा या तिघांविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पो.नि.विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. हेमंत भंगाळे पूढील तपास करीत आहेत.

# अखेर ५० रुपयांच्या भूर्दंडापासून दिंडोरीतील नागरिकांची सुटका

## पत्र रद्द करत असल्याचे गटविकास अधिकाऱ्यांकडून पत्रक

**दिंडोरी ।** दिंडोरी तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीतील घरांना क्रमांक देणे आवश्यक असल्याच्या कारणावरून एका एजन्सीला तालुक्यातील प्रत्येक गावात पाठवून नागरीकांकडून त्या बदल्यात ५० रूपये वसुली करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या पत्राच्या संदर्भावरुन दिंडोरी गटविकास अधिकाऱ्यांनीच पत्र काढल्यावर एकच संताप व्यक्त करण्यात आला.

यावरून माजी आमदार रामदास चारोस्कर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत गटविकास अधिकारी कार्यालयात धडक देत पत्रात दिलेल्या आशयाचे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचा नेमका संबंध काय? असा थेट प्रश्न उपस्थित करत हे पत्र तात्काळ रद्द करण्यात यावा अन्यथा होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार असेल असा इशारा दिला असता गटविकास अधिकाऱ्यांनी तात्काळ ते पत्र मागे घेतल्याने नागरिकांची ५० रुपयांचा भुर्दंड सोसावा लागणार नसल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.


घराच्या दरवाजावर प्लेट बसवण्यासाठी ५० रुपयांचा भुर्दंड नागरिकांनी का सोसावा? यावर आवाज उठवत गटविकास अधिकाऱ्याच्या दालनात माजी आमदार रामदास चारोस्कर यांच्या समवेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिंडोरी लोकसभा समन्वयक योगेश बर्डे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष शामराव हिरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाध्यक्ष पांडुरंग गणोरे , राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष तौसिफ मनियार, माजी उपसभापती वसंत थेटे, राकेश शिंदे, माकपचे तालुकाध्यक्ष रमेश चौधरी, डी. वाय. एफ. वाय. तालुकाध्यक्ष अप्पासाहेब वटाणे, यांनी धडक दिली होती. असले मोघम आदेश दिंडोरी तालुक्यात चालणार नाही ते पत्र रद्द करा असे खडेबोल दिंडोरी गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांना सुनावले त्यावर संबंधित पत्र तात्काळ मागे घेण्याचे आश्वासन गटविकास अधिकाऱ्यांनी दिले आहे. यावर गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांनी तात्काळ पत्र काढले असून त्या पत्राद्वारे तालुक्यातील माजी लोकप्रतिनिधी तसेच सरपंच यांच्या सांगण्यावरून सदर पत्र रद्द करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

> “ नागरिकांना विनाकारण पन्नास रुपयांचा भुर्दंड सोसावा लागणार असल्याचे लक्षात येताच माजी आमदार रामदास चारोस्कर यांच्या समवेत मी स्वतः तसेच आमच्या पक्षाचे पदाधिकारी योगेश बर्डे, मित्र पक्षाचे पदाधिकारी शामराव हिरे, तौसिफ मनियार, माजी उपसभापती वसंत थेटे, राकेश शिंदे, माकपचे रमेश चौधरी, अप्पासाहेब वटाणे आदी आम्ही गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन त्यांना ते पत्र रद्द करण्यास भाग पाडले. आणि आज गटविकास अधिकाऱ्यांनी ते पत्र देखील रद्द केल्याचे पत्राद्वारे जाहीर केले आहे. यापुढे देखील असे अन्यायकारक आदेश निघाल्यास आम्ही त्याचा विरोध करू. जनतेवर अन्याय होणार नाही याची नक्कीच दक्षता घेऊ.
> – **पांडुरंग गणोरे, तालुकाध्यक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे**

## ➤ महत्त्वाचे

### तिडके कॉलनीतील समस्यांनी नागरिक हैराण

**नाशिक ।** तिडके कॉलनी राजा शिवाजी केंद्रासमोर रत्नप्रभा व नंदिनी अपार्टमेंट येथील



रस्ता अतिशय बिकट परिस्थितीत खराब झालेला आहे. ही ज्वलंत भेडसावणारी समस्या कधी सुटेल या विवंचनेत तिडके कॉलनीतील नागरिक त्रस्त आहेत. या ठिकाणी रोज अपघात होत आहेत. आजुबाजुला रहिवासी वसाहत आहे. पावसाचे पाणी रस्त्यावर साचलेले आहे. एसएसके हॉटेल जवळ देखील अशीच परिस्थिती आहे. राजा शिवाजी केंदासमोरील रस्ता रुंदीकरण करणे सुरक्षिततेच्या दृष्टीने नितांत गरजेचे आहे. रस्त्यावर केबल वायर देखील पडलेली असते. त्यामुळे अपघात होतात. संबंधीत ज्वलंत समस्येकडे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका, ट्रॅफिक पोलिसांनी लक्ष देऊन हे ज्वलंत प्रश्न त्वरित मार्गी लावावेत, अशी मागणी भाजप प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य प्रदीप पाटील यांनी केली.

### कावेरी पगारे अण्णाभाऊ साठे पुरस्काराने सन्मानित

**लखमापूर ।** पिंपळगाव बसवंतच्या सामाजिक



कार्यकर्त्या व प्रा.कावेरी पगारे-देवरे यांना शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने शाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेत सन्मानीत केले आहे. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाठ यांनी स्वतः पत्राद्वारे या पुरस्काराची माहीती श्रीमती पगारे यांना दिली आहे. समाजातील वंचित व दुर्लक्षीत घटकांसाठी आपण आजपर्यंत केलेल्या कामाची शासनाने दखल घेऊन आपणास हा पुरस्कार दिल्याचे संजय शिरसाठांनी पत्रात म्हटले आहे. या पुरस्काराबद्दल मंत्री दादा भुसे, आ. दिलीप बनकर, नानासाहेब बोरस्ते, माणिकराव बोरस्ते, अमृता पवार, जेष्ट पत्रकार अशोक थोरात, प्रल्हाद पानपाटील आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### काळजात जपलेली उलघाल म्हणजे कविता : जनार्दन देवरे

**नाशिक ।** कवितेला कुठलाही विषय वर्ज्य नसतो. ती समाजाभिमुख असल्याने साऱ्या समाजाचे प्रश्न, सुख, दुःख घेऊनच ती वाचकांपुढे येत असते.




कवीकडे विचारांचं भांडवल असल्याशिवाय नवे विचार सापडत नाहीत. कारण काळजात जपलेली उलघाल म्हणजे कविता असते, असे प्रतिपादन जनार्दन देवरे यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात 'अंतर्दाह' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सनदी अधिकारी बी.जी.वाघ होते. देवरे पुढे म्हणाले की, प्रतिभासंपन्न कवीने सारेच काव्यप्रकार हाताळायला हवेत. लोककवी विठ्ठल वाघ, खलील मोमीन, प्रा.गो.तु.पाटील, आनंद जोर्वेकर, उत्तम कांबळे, अरुण काळे अशा ज्येष्ठ साहित्यिकांच्या मार्गदर्शनातून माझा 'अंतर्दाह'हा काव्यसंग्रह घडत गेला. १९९८च्या दरम्यान सुरू झालेला 'अंतर्दाह'चा प्रवास २००४ मध्ये प्रकाशित झाल्याने संपन्न झाला, असे सांगून त्यांनी 'अंतर्दाह'या काव्यसंग्रहातील काही कवितांचे सादरीकरणही केले.

# दहिवडला जिजामाता माध्यमिक विद्यालयाच्या शाळेचे पत्रे उडाले

**देवळा ।** तालुक्यात शुक्रवारी दि ६ रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. यात तालुक्यातील दहिवड येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयाच्या शाळेचे पत्रे उडाले. शाळा बंद असल्याने मोठा अनर्थ टळला असून शाळेचे नुकसान झाले आहे.



सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी मध्यम ते काही ठिकाणी जोरदार पाऊस झाला असून दहिवड येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयातील सहावी ते दहावी या पाच वर्ग खोल्यावरील वादळी वाऱ्याने पत्रे उडाले आहेत. विद्यालयातील वर्ग खोल्याचे पत्रे उडाल्याने मोठे नुकसान झाले असून, शाळा बंद असल्याने मोठा अनर्थ टळला आहे. कार्यालय वगळता वर्ग खोल्याचे पत्रे उडाली आहे. यात नवीन पाठ्यपुस्तके काही प्रमाणात पासवसाने भिजली आहेत. वाऱ्याचा वेग मोठ्या प्रमाणावर असल्याने वर्ग खोल्यावरील पत्रे शाळेच्या आवारात पडले. हे पत्रे शाळेच्या आवारात असलेल्या झाडांना अकडून पडल्याने पुढील अनर्थ टळला. याबाबतचे वृत्त समजताच शिक्षक व ग्रामस्थांनी शाळेत धाव घेत उपकरणे व आदी वस्तू सुरक्षित ठिकाणी हलवले असून रात्री उशिरापर्यंत मदत कार्यसुरू होते.

# मराठा हायस्कूलमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा




**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूल मध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक तथा मविप्रसेवक संचालक चंद्रजीत शिंदे पर्यवेक्षक रामनाथ गडाख,देविदास भारती, नंदा जाधव उपस्थित होते.

दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाचे जतन व संवर्धन करणे हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे.आजचा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.इयत्ता दहावी ग ची विद्यार्थिनी अनुष्का ठोंबरे हिने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.पर्यावरण दिन साजरा करण्याची आवश्यकता आपणास का आहे याबाबत तिने सखोल शब्दात आपले मनोगत व्यक्त केले.त्याचबरोबर विद्यालयाचे पर्यवेक्षक रामनाथ गडाख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.दरवर्षी होणारे हवामान बदल,तापमान वाढ, जंगलतोड यासारख्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी पर्यावरण दिवसाची संकल्पना अस्तित्वात आली. खरे पाहता आपल्या भारतीय संस्कृतीत फार आधीपासून पर्यावरण संरक्षणाची व संवर्धनाची जाणीव रुजलेली आहे असे ते आपल्या मनोगतात म्हणाले. आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने विद्यालयात वृक्ष लागवड करण्यात आली सदर सर्व नियोजन हरित सेना प्रमुख भाऊसाहेब टोपे यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात थोरात सर म्हणाले दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो.पर्यावरणाची गुणवत्ता वाढविणे,पर्यावरण विषयक समस्या,पर्यावरणाचे संवर्धन याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरण विषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे.मानव हा पर्यावरणाचा एक कुशाग्र घटक आहे.मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे म्हणून पर्यावरणीय आपत्तीचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन व त्यावर परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी शिक्षण महत्त्वपूर्ण बनले आहे.त्यामुळेच पर्यावरण दिन हा साजरा करणे ही काळाची गरज झाली आहे. या पर्यावरणाचा जर आपण अभ्यास केला तर आपल्याला पर्यावरण विज्ञान,पर्यावरण शिक्षण आणि पर्यावरण तंत्रज्ञान या तीन भागात अभ्यास करावा लागेल. सूत्रसंचालन ऋतुजा जाधव हिने केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# देवळा येथील जिजामाता कन्या विद्यालयात पर्यावरण दिन

**देवळा ।** जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी जगभर ५ जून रोजी साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख साधन आहे. सागरी प्रदूषण, जास्त लोकसंख्या, ग्लोबल वॉर्मिंग, शाश्वत उपभोग आणि वन्यजीव गुन्हेगारी यांसारख्या पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी व सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो.या दिवसाचे औचित्य साधून बुधवार दि. ५ रोजी देवळा



एज्युकेशन सोसायटी संचालित, जिजामाता कन्या विद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यालयाच्या आवारात सामाजिक वनीकरणाचे तुषार भामरे,मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता पगार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. भामरे यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, पर्यावरण म्हणजे प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांच्या कमतरतेपासून मुक्त असे सुंदर जग निर्माण करणे. प्लास्टिकवर बंदी घालणे, अधिक झाडे आणि वनस्पती लावणे, पाणी वाचवणे, पुनर्वापर करणे आणि वन्यजीव आणि प्राण्यांचे जतन करणे हे काही उपाय आहेत जे चांगले पर्यावरण निर्माण करतात. प्रत्येकाने नेहमीच त्यांच्या क्रियाकलापांबद्दल जागरूक असले पाहिजे आणि परिसर स्वच्छ आणि निरोगी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण केले पाहिजे आणि त्यांचा कार्यक्षम आणि काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. एकत्रितपणे, आपण एक सुंदर आणि निरोगी वातावरण निर्माण करू शकतो असे आव्हान उपस्थितांना केले.यावेळी वनरक्षक धनराज बागुल, .निलेश पाटील, श्रीमती सुवर्णा इकडे , पर्यवेक्षक . कौतिक खोंडे आदींसह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थीनी उपस्थित होते.

# शहीद जाट भगतसिंग शैक्षणिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदगाव येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

**नांदगाव ।** शहीद जाट भगतसिंग शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदगाव येथे दिनांक 6 जून 2025 रोजी शुक्रवारी शिवराज्याभिषेक दिन उत्साह सादर करण्यात आला.

मंगल प्रभातजी लोंढा, मंत्री कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्य विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनातून अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे औचित्य साधून कार्यक्रमाची आयोजन करण्याबाबतचे परिपत्रक सर्वच औद्योगिक प्रश्न संस्थांना प्राप्त झाले होते. परिपत्रकातील पंचसूत्रांपैकी सामाजिक समरसता हा विषय आजच्या दिवशी व्याख्यानासाठी निवडला होता. सर्व जाती,धर्म, वर्ग आणि पंथ यांच्यात समता, बंधुता आणि सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणे म्हणजे सामाजिक समरसता यात भेदभाव न करता सर्वांना समान संधी देणे, एकमेकांचा सन्मान करणे, समाजात एकात्मता वाढविणे अपेक्षित आहे.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माननीय श्री नितेशजी शर्मा (शिवभक्त) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्रसिद्ध कवी व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (बालभारती) चे सदस्य डॉक्टर अ. भ. भूषविले. या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य माननीय श्री राहुल शेठ परदेशी, माननीय मंगेश सरोदे, सामाजिक कार्यकर्ते श्री मनोजभाऊ चोपडे,सौ. कावेरीताई शर्मा, शरद जाधव, गणेश अहिरे, संस्थेची गटनेदेशक एम.डी. निकुंभ सर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा संस्थेचे प्राचार्य वाय. के. कुलकर्णी यांनी घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नितीन ठुबे सर व पी.एस. गायकवाड सर यांनी केले. तर सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.ए. आर. मढवई यांनी केले. कार्यक्रमाचे



यशस्वीतेसाठी सौ. उदावंत,सौ.ए.एस. सुरे, श्रीमती पि. के. साखरे, श्री. जी. आर. शिंदे श्री. एस.एस. तायडे, श्री.एच. सी. भुसारे,सौ. टी. एम. जाधव, श्री. आर.आर. गायकवाड, श्री. आर.ए. पवार, श्री. एन. बी. जगताप, श्री.ए.व्हि. पवार, श्री. वसीम शेख, श्रीमती एन.ऐ. अहिरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व कौशल विकास रोजगार उद्योजक्ता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सौ. मनीषा वर्मा मॅडम यांच्या व्हिडिओ संदेशाने करण्यात आली. शिवव्याख्याते नितीनजी शर्मा यांनी शिवजन्मापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंतचे संपूर्ण विचार पुष्प गुंफले. महाराजांची दुर्गनिती, गनिमी कावा, दुर्ग बांधणी तसेच मावळ्यांची जमवाजमव यांचे सखोल विश्लेषण केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ कवी व साहित्यिक माननीय श्री.अ. फ. भालेराव यांनी सामाजिक समरसता हा विषय आपल्या समधुर काव्यपंक्तीच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडला. स्वराज्याचा राज्यकारभार चालू असताना महाराजांनी सामाजिक समता, बंधुता कशाप्रकारे जपली याची विश्लेषण देखील केले. सामाजिक संमतेचे अनेक उदाहरणे व दाखले दिले. भारतीय संविधानाने सामाजिक समता या विषयाला महत्त्व देऊन अधोरेखित केले आहे. हे देखील प्रकर्षाने सांगितले. एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीविषयी, एका समाज घटका विषयी वाटणारी एकात्मता किंवा समता होय. हे डॉक्टर भालेराव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये सांगितले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

# धक्कादायक : सिव्हिल सर्जनची मनमानी

## लाडक्या ठेकेदाराला विना निविदा कोट्यवधींच्या औषध पुरवठ्याचा ठेका

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली









**सिव्हील हॉस्पिटलमधील गैरकारभाराचा... पंचनामा**

**नाशिक ।** गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीचा ब्लॅकलिस्टेड ठेकेदार सिव्हिल सर्जन शिंदे यांचा इतका लाडका आहे की शिंदे हे नंदुरबारमध्ये कार्यरत असताना याच ठेकेदाराला कोट्यवधी रुपयांची कामे दिल्याची माहिती समोर येत आहे. सिव्हिल हॉस्पिटल मधील ऑपरेशन थिएटर आणि प्रसूतीगृहाचे काम वादात सापडलेले असतानाही काही दिवसांपूर्वी कोट्यवधी रुपयांची औषध पुरवठ्याचे टेंडर विना निविदा नियमांची मोडतोड करत पुन्हा एकदा गेटवेल कंपनीच्या लाडक्या ठेकेदाराला दिल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून सिव्हिल हॉस्पिटलच्या नसलेल्या प्रतिष्ठेला गालबोट लावणारी आहे. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरून या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

जिल्हा वार्षिक आदिवासी योजनेअंतर्गत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये होणाऱ्या औषध खरेदीसाठी जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता देताना सदर कामाची निविदा प्रक्रिया राबवावी असे आदेश दिले असताना सिव्हिल सर्जन शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला हरताळ फासत मागील वर्षाच्याच म्हणजेच गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीच्या 'लाडक्या' ठेकेदाराला विना निविदा टेंडर मंजूर केले आहे.टेंडर मंजूर करताना सर्वच शासकीय नियम धाब्यावर बसवले आहे. या गंभीर प्रकारामुळे सिव्हिल सर्जन हे जिल्हाधिकाऱ्यांना देखील जुमानत नसल्याचे स्पष्ट होत असून सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शिंदे यांची हुकूमत सुरू असल्याचे दिसून येत आहे.

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गेल्या काही वर्षांपासून गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीच्या 'लाडक्या' ठेकेदारालाच कामे मिळत असल्याने सिव्हिल सर्जन यांचा या ठेकेदारावर वरदहस्त असल्याचा आरोप केला जात आहे. गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीला २०१९ मध्ये एचएएल मधून ब्लॅक लिस्टेड केले होते. महाराष्ट्र राज्याच्या नियमानुसार सदर ठेकेदार पुढील तीन वर्षे कोणत्याही शासकीय टेंडर प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाही तसेच २०२५ पर्यंत मागील तीन वर्षात कुठही ब्लॅकलिस्टेड नाही अशा प्रकारचे प्रमाणपत्र देखील देऊ शकत नाही. परंतु सिव्हिल सर्जन यांनी लाडक्या ठेकेदारासाठी सर्व शासकीय नियम धाब्यावर बसवत २०१९ पासून सर्रासपणे गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीला कोट्यवधी रुपयांची कामे दिली आहे. या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार देखील झाल्याचा आरोप केला जात आहे. असे असतानाही सिव्हिल सर्जन शिंदे यांचे या ठेकेदारावर विशेष प्रेम असल्याने त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात आहे. काम पूर्ण न करताच त्यांनी ठेकेदाराला थोडेथोडके नाही तर तब्बल ४ कोटी ७४ लाख रुपयांचे देयक अदा केले आहे. त्यामुळे हा पैसा नेमका कुणाच्या घशात गेला आहे याचाही शोध घेण्याची मागणी केली जात आहे.

सिव्हिल सर्जन शिंदे हे नंदुरबार येथे कार्यरत असताना नंदुरबार जिल्हा रुग्णालयात देखील गेटवेल डिस्ट्रीब्यूटर च्या ठेकेदाराची चलती होती.या ठेकेदाराला कोट्यवधी रुपयांची कामे दिली जात होती. त्या कामांचा आणि वस्तूंचा दर्जा अतिशय निकृष्ट असताना या ठेकेदारावर विशेष मेहरबानी केली होती. या सर्वच प्रकारामुळे डॉ. शिंदे यांच्या भूमिकेविषयी संशय घेतला जात असून शिंदे हे गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीचे अदृश्य भागीदार असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकरणी वरिष्ठ पातळीवरून चौकशी होईल का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये औषध खरेदीसाठी मिळालेला निधी हा आदिवासी प्रकल्प विभागाचा असतानाही लाडक्या ठेकेदारासाठी हा निधी वळवल्याचे बोलले जाते.त्यामुळे आदिवासी भागातील रुग्णालयांवर एक प्रकारे अन्याय होत असून लाडक्या ठेकेदारासाठी केलेली उठाठेव सिव्हिल सर्जन च्या अंगलट येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सुमारे ४ कोटी रुपयांचा निधी औषध खरेदी साठी जिल्हाधिकारी यांची २३ मार्च २०२५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तर २६ मार्च २०२५ रोजी उपसंचालकांची तांत्रिक मान्यता मिळाली आहे. त्यानुसार खरेदी प्रक्रिया शासनाच्या विहित नियमानुसार राबविणे बाबत निर्देश असताना ई-टेंडर किंवा जीईएमएस वर खरेदी न करता जुन्याच प्रशासकीय मान्यता आणि जुन्याच तांत्रिक मान्यते नूसार सर्वात लाडक्या गेटवेल डिस्ट्रीब्यूटरला ऑर्डर दिलेल्या आहेत हा संपूर्ण प्रकार अतिशय गंभीर असून या संबंधित चौकशी झाल्याशिवाय ठेकेदाराला कुठलेही देयक अदा करू नये, अशी मागणी केली जात आहे.

महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाकडून खरेदी संदर्भात राज्यस्तरावरून व्हीसी घेण्यात येत असते. या व्हीसी मध्ये गेटवेल डिस्ट्रीब्यूटर कंपनीचा लाडका ठेकेदार हा शासकीय संगणक हाताळताना दिसून येतो. शासनाकडून मिळणाऱ्या सूचनानुसार हा सिव्हिल हॉस्पिटल मधील सिव्हिल सर्जन चारुदत्त शिंदे आणि इतर फार्मसीस्ट यांच्यासमवेत शासनाकडून मिळालेल्या आदेशांचे अवलोकन करून त्यानुसार जिल्हा रुग्णालयामध्ये टेंडर मध्ये आपली कंपनी कशी बसेल याकरिता नियोजनात असतो. हा खाजगी कंत्राटदार शासकीय संस्थेचे संगणक हाताळत असून टेंडर करण्याकरिता सिव्हिल हॉस्पिटल नाशिकचे जीईएम पोर्टल अकाउंट आणि त्याचे पासवर्ड स्वतः वापरत असल्याचा आरोप केला जात आहे. स्वतःच्या मर्जीने अटी शर्ती ठेवून इतर कोणत्याही कंत्राटदारस त्या निविदेमध्ये भाग घेऊ देत नाही. त्याच्यासमवेत दरवर्षी रुद्राक्ष फार्मा, रैनायासन फार्मासिटिकल आणि कार्तिक डायग्नोस्टिक या कंपन्यांना सोबत घेऊन सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मनमानी पद्धतीने टेंडर प्रक्रिया राबविली जात आहे. ह्या सर्व गोष्टींची तक्रार आयुक्त तसेच जिल्हाधिकाऱ्यांना देऊन देखील आजपर्यंत त्यांच्यावर कोणतेही प्रकारची कारवाई होत नसल्याने या ठेकेदारांचे धाडस वाढल्याचे दिसून येत आहे.

**जिल्हा शासकीय रुणालया- संदर्भात कुठलीही तक्रार असल्यास दै. महासागर, 0253- 4513384 यावर संपर्क साधावा**

# जि.प अधिकाऱ्याचा संडे एन्जॉय थेट शासकीय व्हॉट्सअॅप ग्रुपवर...

## दारू, चकणा आणि बिर्याणीच्या फोटोने अधिकाऱ्यांना झिंग

सुधीर उमराळकर







**नाशिक ।** ...काल रविवार शासकीय सुट्टीचा दिवस.... अशातच कुठल्या न कुठल्या विषयावर गजबजलेले शासकीय व्हाट्सअप ग्रुप मध्ये देखील कमालीची शांतता होती... अशातच जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या एका ग्रुपमध्ये शांतता पसरलेली असताना अचानक दारूची बाटली, चकना, आणि खमंग बिर्याणी चा फोटो ग्रुप वर धडकला आणि त्यामुळे सर्वच आवाक झाले.फोटो बघून सर्वत्र शांतता पसरली होती... काहीजण तर झूम करून ब्रँड देखील चेक करत होते.....फोटो बघून प्रत्येकाच्या मनात प्रश्नचिन्ह उमटले होते तर काहींना झिंग चढली होती. अधिकारी देखील धीरगंभीर झाले होते. या प्रकारामुळे काल दिवसभर जिल्हा परिषद वर्तुळात याच फोटोंची चर्चा सुरू होती.

त्याचं झालं असं... जिल्हा परिषद तसेच तालुका अंतर्गत सर्व कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सचिव व इतर अधिकारी असे एकूण ७५ अधिकारी व कर्मचारी या व्हाट्सअप ग्रुप मध्ये सहभागी आहेत. याच ग्रुप मध्ये काल दुपारी एका 'विशाल' हृदयाच्या एका अधिकाऱ्याने रंगीत संगीत पार्टीचे फोटो अपलोड केले.. आणि सर्वत्र सन्नाटा पसरला. फोटो वरून हा अधिकारी 'सूर्याचा वंशज' असल्याने संडे एन्जॉय करत असल्याचे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले. कुणीही त्या आक्षेपार्ह फोटोंबाबत प्रतिक्रिया देत नव्हते. सर्वत्र शांतता असताना एका वरिष्ठ अधिकाऱ्याने संबंधित प्रकाराबाबत थेट ग्रुप वरच जाब विचारला. त्यानंतर या प्रकाराला वाचा फुटली. व्हाट्सअप वर आलेल्या फोटोमध्ये विदेशी मद्याची बाटली, चकणा आणि खमंग बिर्याणी दिसत होती फोटो टाकणारा मात्र दिसत नव्हता. हा प्रकार जरासा विचित्रच होता पण टाकणाऱ्याने जे धाडस केले ते वाखणण्याजोगे होते. त्या अधिकाऱ्याने असे फोटो ग्रुप वर का टाकले... ?त्यांना कुणाला आमंत्रित करायचे होते का...? की कुणाला खिजवायचे होते....? असे अनेक प्रश्न या निमित्तानं उपस्थित केले जात असून या अधिकाऱ्याच्या धाडसाला मात्र सलामच केला पाहिजे... अशा पद्धतीने रंगीत संगीत पार्टीचे फोटो टाकणारा 'विशाल' हृदयाचा अधिकारी कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात असून थेट व्हॉट्सअॅप ग्रुपवर अशा पद्धतीचा फोटो अपलोड केल्याबद्दल या अधिकाऱ्याविरुद्ध काय कारवाई होणार याबाबत सर्वांचे लक्ष लागून आहे.

# पेठ नगरपंचायत उपनगराध्यक्षपदी गावित



**पेठ ।** पेठ नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदाच्या आज झालेल्या निवडणुकीत गौरव गावित यांची निवड झाली. माकपाच्या तत्कालीन उपनगराध्यक्षा अफरोजा शेख यांच्यावर दि.१९ मे रोजी विशेष सभेत अविश्वास ठराव आणुन तो पारित झाला तेव्हा पासून रिक्त असलेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या (दि.६) रोजी पीठासीन अधिकारी तहसीलदार आशा गांगुर्डे (संघवी) यांच्या उपस्थितीत विशेष सभेत झालेल्या निवडणुकीत गौरव नारायण गावीत यांना अकरा मते मिळाली तर प्रतिस्पर्धी उमेदवारास तीन मते मिळाली. गौरव गावित यांना अधिकची मते मिळाल्याने पीठासीन अधिकारी आशा गांगुर्डे यांनी गावित यांना उपनगराध्यक्षपदी निवड घोषित केली.

# नाशिकॉन परिषदेला दिमाखात सुरुवात

## राज्यभरातून चारशेपेक्षा जास्त बालरोग तज्ज्ञांनी नोंदविला सहभाग




**नाशिक ।** 'नाशिकॉन २०२५-द कॉन्फरन्स विथ द डिफरन्स' या बालरोग तज्ज्ञांच्या राज्यस्तरीय परीषदेला शनिवारी (७ जून) हॉटेल ट्रिट येथे दिखामात सुरुवात झाली आहे. या परीषदेनिमित्त राज्यभरातून ४०० पेक्षा जास्त बालरोग तज्ज्ञ सहभागी झाले असून, त्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते आहे. उद्घाटन समारंभास मुंबई येथील प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. उमा अली यांनी विशेष उपस्थिती होती.

परीषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात परीषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मिलिंद भराडिया म्हणाले, नाशिकॉन स्पर्धेला सुरुवात करताना पहिल्या परीषदेत २०१५ साली डॉ.उमा अली यांचे गौतम कोपीकर ओरीएशन झाले होते. त्यानंतर प्रत्येक परीषदेसाठी डॉ.अली यांनी मार्गदर्शन केले आहे. यावर्षीची परीषद माझ्यासाठी विशेष महत्त्वाची आहे. परीषद आयोजन समिती अध्यक्षा डॉ.वैशाली भराडिया यांची वैयक्तिक जीवनात व करिअरमध्ये भक्कम साथ दिली असून, संघटनेच्या इतरही सदस्यांच्या मदतीने परीषदेचे सातत्याने आयोजन करता आल्याचे त्यांनी नमूद केले.

नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ.सागर भालेराव म्हणाले, नाशिकॉन परीषदेची गेल्या काही महिन्यांपासून तयारी सुरु आहे. या परीषदेसाठी अनेक सदस्यांनी अथक मेहनत घेतली असून, त्यांच्या प्रयत्नांतून आज ही परीषद यशस्वी होते आहे. संघटनेच्या माध्यमातून सामाजिक दायित्व म्हणून स्कूल हेल्थ टॉक, ॲनिमिया जनजागृती, थॅलेसिमियाबाबत जागरुकता, रक्तदान शिबिरे आदींचे आयोजन केले आहे.

डॉ.उमा अली म्हणाल्या, अनेक परीषदा होत असल्याने नाशिकॉन परीषदेची खरोखर गरज आहे का, असे पहिल्या परीषदेला उपस्थित राहाताना विचार आला होता. परंतु या परीषदेची सर्वसमावेशकता लक्षात घेता, परीषदेने उपयुक्तता सिद्ध केली आहे. एकीकडे शास्त्रोक्त सत्रांच्या माध्यमातून ज्ञानवर्धन घडविले जात असून, दुसरीकडे लव्ह यू जिंदगी सारख्या सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनांतून सहभागी डॉक्टरांना तणाव मुक्त करण्यासाठी प्राधान्य दिले जाते आहे. नाशिकसारख्या ऐतिहासिक, धार्मिक महत्त्व लाभलेल्या शहरात होत असलेल्या या परीषदेत सहभागी होण्याचे समाधान वेगळेच असते. परदेशात असल्याने केवळ एका परीषदेत उपस्थित राहाता आले नाही. उर्वरित सर्व नाशिकॉन परीषदांमध्ये उपस्थित राहिल्याचे त्यांनी आवर्जुन सांगितले.

उद्घाटनानंतर दिवसभरात विविध सत्रांमध्ये तज्ज्ञांनी सहभागींना मार्गदर्शन केले. रविवारी (८ जून) या परीषदेचा समारोप होणार आहे. परीषदेच्या यशस्वीतेसाठी परीषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मिलिंद भराडिया, आयोजन समिती अध्यक्षा डॉ. वैशाली भराडिया, नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. सागर भालेराव, सायंटिक कमिटीमध्ये डॉ. अमोल मुरकुटे, सचिव डॉ.कविश मेहता, डॉ.प्राची बिरारी,डॉ. नितीन सुराणा, डॉ.अतुल बोंडे, डॉ. कदम, डॉ. पगार, डॉ. नितीन मेहकरकर, डॉ. तुषार गोडबोले, डॉ. प्रवीण गडसिंग, डॉ. प्रकल्प पाटील, डॉ. अरुण गचाले, डॉ. राहुल पाटील, डॉ. स्वाती भूतडा, डॉ. शलाका बागुल, डॉ. तृप्ती महात्मे, डॉ. दिपश्री ततार, डॉ. सुशील पारख परिश्रम घेत आहेत.

# गुटखा माफिया बोथराकडून परराज्यातून गुटख्याची तस्करी



**नाशिक ।** संपूर्ण राज्यात सुगंधी गुटख्याला विक्री करण्यासाठी राज्य सरकारने बंदी घातलेली असताना. निफाड तालुक्यातील विंचूर परिसरातील गुटखा माफिया निलेश बोथरा हा राजरोसपणे अनेक राज्यांच्या सीमा ओलांडत विंचूर पर्यंत कोट्यवधी रुपयांच्या गुटख्याची तस्करी करीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील विंचूर येथील गुटखा माफिया निलेश बोथरा व महेश आहेर या दोघांना गुटख्याच्या गोण्यासह वाहतूक करणारी पिकअप गाडी नांदगाव पोलिसांनी दमदार कामगिरी करत पोलिसांना गुंगारा देणारा गुटखा माफिया निलेश बोथरा व सहकारी यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. गुटखा माफियाला अटक झाल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत. कधी आयशर गाडी तर कधी पिकअप गाडीने दिवसाढवळ्या तो गुटख्याची वाहतूक करत होता. हा गुटखा नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यात एका दिवसात पानदुकान, किराणा दुकानदार यांना वाटप करीत होता.हा गुटखा दुसऱ्या राज्यातून आपल्या नाशिक,अहिल्यानगर जिल्ह्यात राजरोसपणे दिवसाढवळ्या विक्रीसाठी जात होता. या गुटखा माफियाकडे आज पर्यंत पोलिस, फूड अँड ड्रग्स विभागाने का दुर्लक्ष केले हा संशोधनाचा विषय आहे. मात्र नांदगाव तालुक्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांची भूमिका कायमच अवैध धंदे चालकांविरोधात असल्याने त्यांनी विंचूरच्या या गुटखा माफियाच्या मुसक्या आवळल्या. या गुटखा माफियाला नेमके पाठबळ आहे. कुणाच्या जीवावर हा व्यवसाय सुरू आहे.याबाबत उलट सुलट चर्चा होत आहे.हा गुटखा माफिया किमान पंधरा ते वीस वर्षे पासून गुटख्याची तस्करी करत आहे. मात्र काही भ्रष्ट पोलीस अधिकाऱ्यांचे त्याला कायमच पाठबळ मिळत असल्याने त्याचे धाडस वाढत गेले त्यामुळे येणाऱ्या काळात या गुटखा माफियाची पाळेमुळे उखडली जातील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# प्रवासा दरम्यान चोरी करणाऱ्या महिला निफाड पोलिसांच्या जाळ्यात

**निफाड ।** येवला ते नाशिक या बसमधून पाच ते सहा संशयित महिला (वय अंदाजे ३५ ते ४०) या आपल्या लहान बाळांना सोबत घेऊन चोरीच्या उद्देशाने निफाड कडे येत असल्याची माहिती निफाड पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड पोलिसांनी, निफाड बसस्थानकात सापळा रचत सकाळी ११ वाजेच्या दरम्यान निफाड बस स्थानकात या महिलांना अटक केली.

सदर संशयित महिला दि. २४ मे रोजी नाशिक ते संभाजीनगर चे बसने प्रवास करत असतांना औरंगाबाद नाका ते चांदोरी चौफुली दरम्यान २ ते ३ च्या दरम्यान येवला येथील एका फिर्यादी महिलेच्या कपड्याचे बॅगमधून एक सोन्याचे गंठण, पोत ,अंदाजे ६० हजार रुपये किमतीचे सोने चोरी केले ,असून सायखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच सदर संशयित महिलांनी मालेगाव ते अहिल्यानगर प्रवासादरम्यान दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी सावरगाव शिवार ता. येवला दरम्यान दिड लाख रूपये किमतीची ३ तोळे वजनाची सोन्याची पोत व १० हजार रुपये किमतीचे दहा भार वाजनाचे चांदीच्या ब्रेसलेटची चोरी केली होती. सदर घटने बाबत येवला शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली होता.

सायखेडा व येवला येथील या फिर्यादी महिलांना निफाड पोलीस ठाण्यात बोलविण्यात आले होते. फिर्यादी महिलांनी या संशयित महिलांना ओळखले असून याच महिलांनी आमची सोने चोरी केल्याची कबुली दिली, त्यांचा पुरवणी जबाब नोंदवून पुढील कारवाईसाठी सायखेडा व येवला पोलीस ठाण्यातील तपासी अंमलदार यांच्या ताब्यात देण्यात आले आहे, या कारवाईत पोलीस कपालेश्वर ढिकले, नितीन साळवे, धनंजय जाधव, नितीन सांगळे, संगीता जाधव, पुनम शिंदे, राजेंद्र दरोडे, यांनी भाग घेऊन सदर महिलांना पकडण्यात यश मिळविले.



"बस प्रवासाच्या दरम्यान प्रत्येक नागरिकांनी व महिलांनी सावध राहूनच प्रवास करायला हवा आपले मौल्यवान दागिने प्रवासात घालने टाळावे,पैसे चोरीला जाऊ नये याकरिता खिसे कापूं पासून सावधगिरी बाळगावी तसेच आपल्या मागे व पुढे शेजारी बसलेल्यांचा अंदाज घ्यावा, गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी व महिलांनी आपले मोबाईल, पैशाचे पॅकेट यांची काळजी घेतली पाहिजे. जर कुणाला एखाद्या व्यक्तीच्या संशयास्पद हालचाली वाटल्यास ११२ या नंबर वर फोन करून माहिती दिली पाहिजे किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधला पाहिजे.

**- गणेश गुरव, पोलिस निरीक्षक, निफाड पोलीस ठाणे**

# अखेर मनमाडला पावसाचे मेघगर्जनेसह जोरदार पुनरागमन



**मनमाड ।** गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने अखेर सायंकाळी मेघगर्जनेसह जोरदार पुनरागमन केले. सकाळपासूनच आभाळात ढग दाटून आल्यामुळे वातावरणात आद्रता जाणवत होती आणि उकाड्याचा त्रास जाणवत होता. मात्र, सायंकाळी साडेचारच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह पावसाची सुरूवात झाली आणि काही मिनिटांतच मुसळधार पावसाने शहराला झोडपून काढले. पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचले. काही भागांमध्ये वाहतूक ठप्प झाली तर काही ठिकाणी नाल्यांचे पाणी रस्त्यांवर आले. काही भागात घरांच्या परिसरातही पाणी साचल्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली. पावसाचा जोर इतका होता की, अवघ्या काही तासांत सर्वत्र पाणीच पाणी झाले.

वादळी वाऱ्यांमुळे काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्याचे समजते. या वाऱ्यांचा फटका वीजपुरवठ्यालाही बसला असून, अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. अचानक अंधार पसरल्याने नागरिकांना रात्रीची कामे अडचणीत आली. वीज विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून दुरुस्तीचे काम सुरू असून लवकरच वीजपुरवठा पूर्ववत केला जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. पावसामुळे वातावरणात मोठा बदल जाणवला असून, दिवसाचा उकाडा गारव्यात बदलला आहे. अचानक आलेल्या या गारव्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. पावसाने मनमाड परिसरातील शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण असले तरी पावसाचा प्रत्यक्ष साक्षात्कार होत नव्हता. त्यामुळे शेतकरी चिंतेत होते. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी मका आणि इतर पिकांची लावणी सुरू केली होती, तर अनेकांनी बी-बियाणे घेऊन पावसाची प्रतीक्षा केली होती. पावसामुळे शेती कामांना आता वेग येणार आहे. मशागतीची कामे याआधीच पूर्ण करून ठेवलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस वरदान ठरणार आहे. जमिनीत ओल निर्माण झाल्याने पेरण्या सुरू करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत शेतशिवार गजबजून जाईल. शेतीच्या दृष्टीने पाहता हा पाऊस खरीप हंगामाची चांगली सुरुवात ठरू शकतो. हवामान खात्याने पुढील काही दिवसांमध्ये हलक्यापासून मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला असून शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून कामे हाती घ्यावीत असा सल्ला देण्यात आला आहे.

# मनमाडला बकरी ईद उत्साहात साजरी





**मनमाड ।** मुस्लिम बांधवांसाठी पवित्र असलेल्या ईद-अल-अजहा म्हणजेच बकरी ईदचा सण शहर परीसरात उत्साहाने साजरा केल. यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त सामुदायिक नमाज पठण होऊन देशात शांतता सद्भावना आणि एकता नांदावी यासाठी दुवा पठण करण्यात आले.

बकरी ईद हा मुस्लिम बांधवांसाठी त्याग आणि बलिदानाचे प्रतीक मानला जाणारा महत्त्वाचा सण आहे.ईदच्या दिवशी सकाळी सामूहिक नमाज पठानंतर जनावरांची कुर्बानी दिली जाते. या पार्श्वभूमीवर शनिवारी सकाळी मनमाड शहरातील जुनी ईदगाह आणि आयुडीपी परिसरातील डॉक्टर गुजराती हॉस्पिटलच्या मागे नवीन ईदगाह या दोन्ही मैदानावर सामूहिक नमाज पठणाचा कार्यक्रमात हजारो मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला. नवा ईदगाह मैदानावर मौलाना असलम रजवी तर जुना ईदगा मैदानावर हाफिज वाशिम शेख यांनी नमाज पठणाचे नेतृत्व केले. मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण अदा केले त्यानंतर दुवा पठण करण्यात आली. देशात शांतता, सद्भावना, एकता नांदावी तसेच सर्वत्र चांगला पाऊस पडावा यासाठी विषय प्रार्थना व दुवा पठण करण्यात आले. नमाज पठणानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना अलिंगन देत बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कब्रस्तान मध्ये जाऊन आपल्या पूर्वजांचे स्मरण केले. बकरी ईद निमित्त शहरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून आले. शहर पोलीस व मनमाड नगरपालिका प्रशासनातर्फे या दोन्ही ठिकाणी आवश्यक ती व्यवस्था करण्यात आली होती. पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त असे नियोजन केले होते.

# शेतकरी संघटना पदाधिकाऱ्यांचे कृषीमंत्री कोकाटे यांना साकडे



**सटाणा ।** बागलाण तालुक्यात अवकाळी पावसाने केलेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत मिळावी, तसेच भावांतर योजनेसाठी शासनाकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण बांधील असल्याचे प्रतिपादन राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले. चिनार गेस्ट हाऊस येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाच्या बैठकीत ते बोलत होते.

मंत्री कोकाटे यांनी शिष्टमंडळाशी संवाद साधतांना ते म्हणाले की, मे महिन्यात अवकाळी पावसाने शेतीपिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. ही वस्तुस्थिती आहे. झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. शेतकर्यांना शासनाकडून तातडीने मदत मिळवून देण्यासाठी आपण कटीब्धद असल्याचे स्पष्ट केले. बागलाण तालुका शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने विविध मागण्यासाठी भेट घेतली त्याप्रसंगी कोकाटे यांनी शेतकरी संघटेनेने केलेल्या मागण्या आपण मंत्रीमंडळासमोर मांडून शेतकर्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विनंती करू. शेतकरी संघटेनेच्या शिष्टमंडळात तालुकाध्यक्ष केशव सुर्यवंशी, भास्कर बागुल, नयन सोनवणे, भिका सुर्यवंशी, त्र्यंबक जाधव, देविदास अहिरे, राकेश अहिरे, संदिप सोनवणे, सुनिल बिरारी, प्रविण जाधव, प्रविण सोनवणे, भालचंद्र वाघ, सुरज जाधव, यशवंत गुंजाळ, अविनाश जाधव, रूपेश जाधव आदी उपस्थित होते.

# देवळा शिक्षण विभागाकडून मोफत पाठ्यपुस्तक वितरण; गटशिक्षणाधिकारी सतीश बच्छाव

**देवळा ।** समग्र शिक्षा योजनेतून पंचायत समिती शिक्षण विभागावरून केंद्र व शाळास्तरावर मोफत पाठ्यपुस्तक वितरणाला दिली जात आहे. देवळा तालुक्यातील सर्व शाळांवर पाठ्यपुस्तके पोहोच झाली असून शाळेच्या पहिल्याच दिवशी शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खाजगी अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जाणार आहेत अशी माहिती गटशिक्षणाधिकारी सतीश बच्छाव यांनी शुक्रवार (दि.६) रोजी दिली.



देवळा तालुक्यात इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीसाठी प्रत्येकी १ हजार ६८९ तर चौथी १ हजार ८८६, पाचवी १९६८, सहावी १९५९, सातवी २३४९ आणि आठवी २५७४ अशी प्रत्येक विषयवार पुस्तके गटस्तरावरून वितरित करण्यात आली. यावर्षी एकात्मिक ऐवजी विषयनिहाय स्वतंत्र पुस्तके आल्याने शिक्षकांनी समाधान व्यक्त केले. इयत्ता पहिलीची पाठ्यपुस्तके सीबीएसई पॅटर्ननुसार नव्याने प्रकाशित झाली असल्याने देवळा तालुक्यातील इयत्ता पहिलीच्या शिक्षकांसाठी या नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणाचे आयोजन ९ ते ११ जून दरम्यान केले असल्याचे सांगण्यात आले. १६ जून रोजी नाशिक जिल्ह्यातील शाळांची घंटा वाजणार असल्याने शाळा पूर्वतयारीसाठी मुख्याध्यापक व शिक्षकांच्या बैठकांचे नियोजन करण्यात आले आहे. पाण्याच्या टाक्या, शौचालय, शाळा आवार स्वच्छता, वर्ग साफसफाई, नवागतांचे स्वागत, प्रभातफेरी याबाबत प्रत्येक शाळेचा आढावा घेतला जाणार आहे. शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांच्या सहकार्याने शाळा-शाळांवर विविध शालेय उपक्रमांचे आयोजन करणेसंदर्भात शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व उपक्रमशील शिक्षक यांची मदत घेतली जाणार असल्याचे यावेळी बच्छाव यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा आरोपी निजामपूर पोलिसांच्या ताब्यात

## न्यायालयाने सुनावली ६ दिवसांची पोलीस कोठडी

**पिंपळनेर ।** अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून नराधम घटनास्थळावरून फरार झाला होता. याबाबत पोलिसांकडून घटनेचे गांभीर्य लक्षात घेत सर्वत्र सोशल मीडियावर आवाहन करण्यात आले होते.अखेर पोलिसांनी अत्यंत शिताफीने आरोपीला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे.

निजामपुर पोलीस ठाणे हद्दीत ८ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर आरोपी देवाजी एकनाथ सोनवणे (३९) रा.वाघापुर ता. साक्री जि. धुळे याने २ जून रोजी बलात्कार केला होता.याबाबत प्राप्त तक्रारीवरुन निजामपुर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्यातील आरोपी हा गुन्हा घडल्यापासुन फरार झाला होता. याबाबत धुळे जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे निजामपुर पोलीस ठाण्याचे विविध तपास पथक तयार करुन सदर तपास पथकांनी साक्री, दहिवेल, विसरवाडी, मुल्हेर, पिंपळनेर, नवापुर, सोनगड, नंदुरबार व निजामपुर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व परीसर पिंजुन काढला होता तसेच सदर आरेपी हा मोबाईल वापरत नसुन त्याला पकडणे हे अत्यंत क्लिष्ट झाले होते मात्र असे असतांना देखील स्थानिक नागरीकांमधे सोशल मिडीयाच्या माध्यमातुन आरोपीचे वर्णन व फोटो देऊन सदर इसमाबाबत माहिती मिळाल्यास पोलीस ठाण्याला कळविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने स्थानिक नागरिकांकडून व पोलीस पाटील यांच्याकडुन प्राप्त माहितीच्या अनुषंगाने आरोपीचा छडा लावून त्याला शिताफीने ताब्यात घेण्यात निजामपूर पोलीसांना यश आले आहे. सदर गुन्ह्यात आरोपी देवाजी एकनाथ सोनवणे (वय ३९) रा. वाघापुर ता. साक्री यास अटक करुन पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ६ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.सदरची कारवाई धुळे जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निजामपुर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि मयूर भामरे, पोउपनि चंद्रकांत गायकवाड, मधुकर सोमोसे, यशवंत भामरे, पोहेकॉ नारायण माळचे, आर.यु. मोरे, प्रदीपकुमार आखाडे, प्रशांत ठाकुर, सुनिल अहिरे, पोकॉ राकेश महाले, दिपक महाले, पृथ्वीराज शिंदे, गौतम अहिरे, सागर कांगणे, परमेश्वर चव्हाण, कृष्णा भिल, सागर थाटशिंगारे आदींच्या पथकाने केली आहे.

## महत्त्वाचे

### ‘छत्रपती शिवाजी महाराज सर्किट’ उपक्रमात शाहीर उत्तम गायकरांचा सहभाग

**नाशिक ।** रेल्वे मंत्रालयाच्या ‘आयआरसीटीसी’तर्फे



व महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने भारत गौरव यात्रा टुरिस्ट ट्रेन या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज सर्किट सुरु करण्यात आले असुन मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे भा. प्र .से. यांनी परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध केले आहे.हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली वारशाला मानवंदना देणारा असुन,नागरिकांना त्यांच्या जीवनाशी संबंधित प्रमुख किल्ल्यांप्रमाणे त्याभोवतीच्या धार्मिक स्थळांचा अविस्मरणीय प्रवास या योजनेअंतर्गत पहिली ट्रेन तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिनी ९ जुन २०२५ मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई स्थानकावरुन सुटणार असुन या अभिनव उपक्रमाचे नाशिक जिल्ह्यातून प्रथम मानकरी ठरलेले आनंदतरंग फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शाहीर उत्तमराव गायकर, सुप्रसिद्ध व्याख्याते समाधान हेंगडे पाटील, गडकोट संवर्धक अकाश पाटील यांची निवड झाली आहे. शिवराज्याभिषेक दिनाच औचित्य साधून प्रथम दिनी रायगडावर महाराजांचे दर्शन त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुण्यातील लाल महाल, कसबा गणपती आणि शिवसृष्टीचे दर्शन घेऊन तिसऱ्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच जन्मस्थान शिवनेरी किल्ला व भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विमानाने सातारा प्रतापगड किल्ल्यावरील प्रेक्षणीय स्थळ बघून कोल्हापूर, छत्रपती शाहू महाराज टर्मिनस त्यानंतर महालक्ष्मीचे दर्शन, पन्हाळा किल्ला यादरम्यान येणाऱ्या प्रेक्षणीय स्थळे पाहण्याचा योग जुळून आल्याचे शाहीर उत्तम गायकर यांनी सांगितले.

# घराच्या गच्चीवर फुलवली निसर्गराजी...

## सेवानिवृत्त रमेशकुमार यांनी आवडीतून जोपासलाय छंद!

हवेच्या झोतावर डोलणारी नाना प्रकारची गुलाबपुष्पे... शेवंती, गोकर्ण, कण्हेर, मोगरा, झेंडूसह इतर बहरलेली फुले... वांगी, टोमॅटो, लवंगी मिरची, ढोबळी मिरची, तोंडली आदी फळभाज्यांची रुबाबत उभी टाकलेली रोपटी... आले, हळदीची दुरून खुणावणारी ट्रे वजा कुंडीतील रोपटे... जरा दूर कोपऱ्यात कुंडीत विसावलेली पण तरारलेली कोरफड... कुंडीतील भरारी घेऊ पहाणारा गिलक्याचा वेल... कुंडीतच भरगच्च वाढलेला कडीपत्ता... कुंडीत फोफावू पाहणारे फणस आणि आंब्याचे झाड... कुंडीतील पुदीना... श्रावणात तरारणाऱ्या ब्रह्मकमळाचे मस्त तग धरलेले रोपटे... कोथिंबीरची चव देणारी कुकंबर... शोभेच्या वनस्पतीच्या सजलेल्या अनेक कुंड्या... हे सारं पाहिल्यावर मन अगदी वढाय वढाय होऊन जातं... हे सारं दृश्य आहे ते घराच्या गच्चीवर वाढविलेल्या निसर्गराजीचे... बाग बगीच्याचे...

लहानपणापासूनच लतावेली, वृक्षराजी, फुलझाडी विविधांगी रोपटी यामध्ये रमणाऱ्या रमेशकुमार यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या घराच्या गच्चीवर निसर्गराजी फुलवत आपली आवड आणि छंद जोपासण्याचा गोमटा प्रयत्न केला आहे. कामटवाडे शिवारातील अंबिकानगर येथील लक्ष्मीकृपा रो हाऊसमधील क्रमांक दोनच्या घराच्या गच्चीवर त्यांनी ही बाग फुलविली आहे. रमेशकुमार हे मूळचे केरळचे आहेत.









सभोवताली...

**पूजा भावसार**

**९३२६९१४७०१**

लहानपणापासून महाराष्ट्रातच राहत असलेले रमेशकुमार शुद्ध मराठीत संवाद साधतात. टूल आणि डायमेकर असलेले रमेशकुमार यांनी मुंबई व दुबई येथे कंपनीत नोकरी केली. सेवानिवृत्तीनंतर ते नाशिकला स्थायिक झाले आहेत. फावला वेळ ते या निसर्गछंदात घालवतात. त्यांना लहानपणापासून झाडी-रोपटी लावणे, वाढविण्याचा छंद होता. नोकरी करीत असतानाही त्यांनी बाल्कनीमध्ये विविध प्रकारची रोपटी लावली होती. गुलाब लावले होते. घरातील पडीक भांडी, प्लास्टिकचे टप, बादली, मग, बाटल्या आदी वस्तूंचा वापर करीत त्यांनी त्यात अनेक रोपटी लावली आहेत. पदरमोड करीत त्यांनी अनेक कुंड्याही आणल्या. कुंड्यांसाठी स्टँड बनवून घेतले. झाडी लावली आहेत. शेतात जाऊन माती आणणे, विविध प्रकारची रोपटी -बियाणे मिळविणे आणि आणून ते वाढविणे, विविध प्रकारच्या बिया आणून त्या रुजविणे, झाडांवर कलम करणे आवडते. नाना प्रयोग ते नेहमीच करीत असतात. घरच्या घरी ओल्या कचऱ्यातून कंपोस्ट खतनिर्मिती करून ते लतावेली, फुलझाडी, फळभाज्यांची रोपटे यासाठी वापरतात. कुंड्या, रोपट्यांना नियमितपणे पाणी देण्याबरोबरच त्यांची निगा ते राखतात. गच्चीवर उमलणारी विविध फुले ते पूजेसाठी वापरतात. इतरांनाही देऊ करतात. त्यांनी कुंडीत वांगी, तोंडली, टोमॅटो, ढोबळी मिरची, कारले, गिलके, आले, पुदिना, कोथिंबीर, कढीपत्ता पिकविला असून, त्याचा आस्वादही अनेकदा घेतला आहे, घेत आहेत. त्यांना ही गच्चीवरची बाग अधिक व्यापक करायची असून, विविध प्रयोग करायचे असल्याचे त्यांनी दैनिक "महासागर"शी बोलताना सांगितले. त्यांनी गच्चीवरच्या बागेत सहा प्रकारचे गुलाब, सात प्रकारची गोकर्णाची फुले, पाच ते सहा प्रकारची जास्वंदाची फुले, पाच प्रकारची कन्हेरची फुलझाडी गच्चीवरच्या बागेत लावली आहेत. शोभेची अनेक रोपटेही त्यांनी लावली आहेत. त्यांनी आंबा आणि फणसही लावले असून, कलम प्रयोगही केले आहेत. त्यांना गच्चीवर टरबूज, खरबूज पिकवायचे असून, कारल्याचा वेल मोठ्या प्रमाणात वाढवायचा आहे. त्यासाठी ते तारेचा मंडप उभारणीचे नियोजन करीत असल्याचे त्यांनी सांगितले. सकाळ, संध्याकाळ या गच्चीवर फुलवलेल्या निसर्गरराजीत ते फेरफटका मारतात. वेळ घालवतात. बागकाम करतात. निसर्गाचा आनंद घेतात.

